## सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९–०००० ५२–२०१९

## नियमित दिवाणी दावा क्र. १२/२०१९

## निशाणी क्र.८३ वरील आदेश

प्रतिवादीने सदरचा अर्ज हा वादींकडून काही प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी प्रश्नावली संच देण्यासाठी दिलेला आहे. वादी यांनी हा दावा वाटपाकरीता व हक्कसोड पत्र रद्द करून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. या दाव्याच्या कामी प्रतिवादी यांनी कैफियत दिलेली असून वादीच्या कथनाला उत्तरे दिलेली आहेत. वादीच्या दाव्याचे स्वरूप पाहता वादीच्या कथनात बराच गोंधळ व गुंतागुंत दिसून येते. बराचसा मजकूर हा आधारहीन नमुद केलेला आहे. या मजकुरामुळे न्यायालयास दाव्याचा निकाल देणे सुलभ होणार नाही. तसेच, वादी यास दावा मिळकतीविषयी तसेच सदर मिळकतीशी संबंधित लोकांबाबत खोटी माहिती नमूद केल्याची दिसून येते. त्यामुळे दाव्याच्या सुनावणीकामी योग्य ती परिस्थिती कोर्टासमोर येण्याकरिता वादीकडून काही प्रश्न त्यांचे उत्तरे लेखी स्वरूपात हजर करण्यासाठी आदेश होण्यासाठी प्रतिवादीने हा अर्ज दिलेला आहे.

०२. प्रतिवादीने खालील प्रमाणे प्रश्नावलीचे संच दिलेला आहे–

अ) वादी यांनी दाव्यात दिलेली वंशावळ अपुरी व चुकीची आहे, हे मान्य करावे, मान्य नसेल तर योग्य ती वंशावळ दयावी, तसेच सदरच्या वंशावळीबाबत वादी यांस मिळालेली माहिती कशी प्राप्त झाली ? हे नमुद करावे.

ब) वादीने आपल्या दाव्यातील परिच्छेद क्र.१ येथे नमुद केलेल्या चतु:सिमा मधील जमिन मालक कोण कोण आहेत ? याची माहिती दयावी. माहिती नसेल तर सदर जमिनीचे सर्वे नं., हिस्सा नं. काय आहेत ?

क) वादीने आपल्या परिच्छेद क्र.३ येथे नमुद केल्याप्रमाणे वादी व

प्रतिवादी यांचे एकमेकांशी नाते व भाउबंधकी असेल तर वादी व प्रतिवादी यांचा मूळ परुष कोण होता? हे नमुद करुन वादी व प्रतिवादी हे एकमेकांशी नात्याने कोण लागतात व त्यांचा संबंध काय ? हे नमुद करावे.

ड)दस्त क्र.१२४४/१५ व १२४५/१५ हे वादी व प्रतिवादी क्र.१ यांनी फसवून विनाधिकारी केले होते का ?

इ)१२४४/१५ व १२१४५/१५ हे दोन्ही दस्त वादी व प्रतिवादी क्र.१ यांनी इतर प्रतिवादींनी कशाप्रकारे संगनमत व फसवुन बनवून घेतले होते, हे मान्य करावे, नसेल तर ते बनवून घेण्याचे कारण काय ? हे नमुद करावे.

या संचाप्रमाणे प्रतिवादीने वादीकडून उत्तरे मागितलेली आहेत. सदर प्रश्नावली संच हजर करून त्यानुसार वादी यांच्याकडून उत्तरे मागविल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट प्राथमिक काळातच सत्यसमोर येऊन कोर्टाचा अमूल्य वेळ वाचणार आहे व न्यायदानास मदत होणार आहे. प्रतिवादींनी केलेल्या प्रश्नांच्या संभाव्य उत्तरांमुळे वादीचे कोणत्याही कायदेशीर हक्काचे उल्लंघन होत नाही. अर्ज मंजूर करण्यात येऊन कलम २ मधील उपक्रम (अ) ते (इ) मध्ये नमूद केलेले प्रश्नसंच हजर करून घेऊन सदर प्रश्नांची उत्तरे वादी यांच्याकडून वैयक्तिकरित्या मागविण्यासाठी आदेश व्हावा असे प्रतिवादीने कथन केले आहे.

०३. वादीने सदरच्या अर्जावर म्हणणे देऊन त्यांच्या अर्जातील कथने नाकारली आहेत व सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. नि.क्र.९९ येथे प्रतिवादीने लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. सदरचा लेखी युक्तीवाद वाचला. नि.क्र.१०१ येथे प्रतिवादीने सदर अर्जाच्या पुष्ठ्यर्थ मा. उच्च न्यायालयांचे न्यायनिवाडे दाखल केले आहेत.

1] Shrivallabh S/o Dongardasji Sikchi vs Ibrahimkhan s/o Ahmadkhan and anr., AIR 2015(NOC) 208

2] Transport Corporation of India Ltd. vs Reserve Bank of India, 2018(2) ADR 585

3] P. Balan vs Central Bank of India Calicut, AIR 2000 KER 24

०४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. तसेच दाखल न्यायनिवाडे वाचले. प्रश्नावली हे समोरच्या पक्षकाराची केस कमकुवत करण्यासाठी अथवा स्वतःची केस बळकट करण्यासाठी, तसेच योग्य त्या बाबी समोर येऊन त्याद्वारे न्यायदानास मदत होण्यासाठी व त्यास होणारा वेळ कमी करण्यासाठी प्रश्नावली विचारता येतील असे दिसून येते. यातील वादी यांनी विचारलेल्या प्रश्नावलीतील प्रश्न पाहता, सदरचे प्रश्न हे दाव्याशी जोडलेले असून महत्त्वाचे दिसून येतात. सदरच्या प्रश्नांची उत्तरे वादीने दिल्यास त्यामुळे न्यायदानास मदत होणार आहे. तसेच, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेल्या बऱ्याच मुद्यांचे व वादाचे निराकरण होणारे असून न्यायदानास मदत झाल्यामुळे होणारा विलंबही कमी होणार आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## – **<u>आदेश</u>** –

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर अर्जासोबत दिलेल्या प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे वादी यांनी द्यावीत असे आदेशित करण्यात येते.

NANDA BAPUSO GHATAGE

Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2025.01.16 18:37:13 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः १०/०१/२०२५

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
देवगड.